नि.फौ.ख.क्र. ७८/२०२४
शासन विरुध्द दिपक
नि.क्र. १४

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. २**

मी देवाची शपथ खरे सांगतो की,
माझे नाव – सुरेश शंकर साबळे
वय – ७३ वर्षे,
कामधंदा – शेती
राहणार – पांडेवाडी, तालुका वाई, जिल्हा सातारा

**सरतपास सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती एस.आर. जाधव** -

दिनांक ०६/१०/२०२३ रोजी मी माझ्या मुलीकडे भेटायला भुईंज येथे तिच्या घरी गेलो होतो. फिर्यादी माझ्या मुलीचे पती असून माझे जावई आहेत. त्यावेळी त्यांच्या घरातून त्यांचा तांब्याचा पाणी तापविण्याचा बंब चोरीस गेला होता. त्या अनुषंगाने त्यांच्या घरासमोरील मोकळ्या जागेत ज्या ठिकाणी तो बंब बांधून ठेवला होता त्या ठिकाणाचा पोलिसांनी माझ्या समक्ष पंचनामा केला होता. आता मला तो पंचनामा दाखविण्यात आला. तो तोच असून त्यावर माझी पंच म्हणून सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. तो **निशाणी क्र. १५** वर आहे. त्यावेळी काढण्यात आलेली एकूण ४ फोटो आता मला दाखविले ते आर्टिकल ए ते डी वर आहेत. पंचनामा कार्यवाहीच्या वेळी फिर्यादी, पोलिस, मी स्वतः आणि फिर्यादीचे शेजारी हजर होते. त्या शेजाऱ्याचे नांव मोरे असावे परंतू मला त्याबाबत नक्की आठवत नाही. त्या ठिकाणी बंबाला बांधलेली तुटलेली साखळी व कुलूप दिसून आले होते.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ एल. जी. जेजुरीकर** -

२. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीशी माझे चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी मला कथित पंचनाम्याकरिता बोलाविले नव्हते. कथित साखळी किती लांबी रूंदीची होती तसेच कथित कुलूप कुठल्या कंपनीचे होते याबाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, कथित घटनास्थळावरील घराचा क्रमांक तसेच लांबी, रूंदी

याबाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कथित पंचनामा कार्यवाहीच्या वेळी माझ्या जावयाच्या म्हणजेच फिर्यादीच्या घरी उपस्थित असल्याचे खोटे सांगत आहे हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी माझे जवळचे नातेवाईक असल्याने माझ्या समक्ष सदरची पंचनामा कार्यवाही झाल्याचे मी खोटे सांगत आहे. मी फिर्यादीसह पोलिस ठाण्यात गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेला संपूर्ण मजकूर खोटा आहे व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत,

RAVINDRA MADHUKARRAO BHENDE

Digitally signed by RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Date: 2025.03.17 12:47:07 +0530

दि. १५.०३.२०२५

(आर.एम. भेंडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्यायालय क्र.१,वाई.